बीड । बुधवार

१६.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : १६

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955









# माजलगावमध्ये भरदिवसा भाजप कार्यकर्त्याची हत्या



**माजलगाव । प्रतिनिधी**

बीडच्या माजलगाव शहरात तरुणाची भरदिवसा धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली आहे. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तरुणाचा व्हिडीओ समाज माध्यमातून समोर आला आहे. बाबासाहेब आगे असं मयत तरुणाचं नाव आहे. बाबासाहेब भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता असल्याची माहिती समोर येत आहे.

हत्येनंतर आरोपी स्वतः हा पोलीस ठाण्यात हजर झाला. नारायण शंकर फपाळ असं आरोपीचं नाव आहे. आर्थिक देवाण घेवाणीच्या वादातून हत्या झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

आरोपी नारायण शंकर फपाळ याने कोयता शर्टच्या पाठीमागे लपवून आणला होता. आरोपीने बाबासाहेब आगे यांच्यावर धारदार शस्त्राने वार केले, यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. मंगळवारी दुपारी वर्दळीच्या माजलगाव शहरातील स्वामी समर्थ मंदिराच्या जवळ भरवस्तीत घडलेल्या या घटनेने खळबळ उडाली आहे. माजलगाव तालुक्यातील किटी आडगाव ग्रामपंचायतचे सदस्य असलेले बाबासाहेब आगे हे भाजपच्या तालुका अध्यक्ष अरुण राऊत यांच्या भेटीसाठी माजलगाव शहरात स्वामी समर्थ मंदिराजवळील भाजप कार्यालयात आले होते. त्या कार्यालयाच्या समोरच त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. हत्येनंतर नारायण शंकर फफाळने माजलगाव शहर पोलीस ठाण्यात आत्मसमर्पण केले आणि हत्येची कबुलीही दिली. पोलिसांना याप्रकरणी गुन्हा दाखल करुन अधिक तपास सुरु केला आहे.


आरोपी नारायण शंकर फपाळ

# बीड जिल्हा रुग्णालयात आधीच 3 माता मृत्यू अन् आता महिलेला शस्त्रक्रिया न करताच काढले बाहेर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा रूग्णालयात चालू महिन्यात तीन माता मृत्यू झाले आहेत. त्यामुळे आरोग्य सेवेबद्दल प्रश्न उपस्थित होत असतानाच मंगळवारी सकाळी एका महिलेला वेळ संपली असे कारण सांगून शस्त्रक्रिया गृहातून बाहेर काढले. हा प्रकार दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडला. त्यानंतर याची माहिती वरिष्ठांना दिल्यानंतर त्यांनी धाव घेतली. त्यानंतर ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. परंतू या निमित्ताने गलथान कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

वडवणी तालुक्यातील एक महिला ८ एप्रिल रोजी जिल्हा रूग्णालयात दाखल झाली. अंगावरून लाल, पांढरे जाणे, पोट दुखणे आदी आजार होते. त्यामुळे या महिलेला गर्भपिशवी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर




सर्व तपासण्याही केल्या. परंतू आज-उद्या करून १५ एप्रिलपर्यंत या महिलेच्या शस्त्रक्रियाला टोलवाटोलवी केली. त्यानंतर १५ एप्रिल रोजी सकाळी साडे नऊ वाजता शस्त्रक्रिया गृहात नेले. परंतू १२ वाजेच्या सुमारास वेळ संपली असे सांगून या महिलेला बाहेर काढण्यात आले. त्यामुळे नातेवाईकांनी संताप व्यक्त केला. याप्रकरणाची जिल्हा शल्य चिकित्सिक आणि आरोग्य मंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचे नातेवाईकांनी सांगितले.

सीएस, एसीएस, आरएम ओंची धाव

हा सर्व प्रकार नातेवाईकांनी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांना सांगितला. त्यांनी तातडीने अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सदाशिव राऊत, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एल.आर. तांदळे यांना

▶▶ उर्वरित पान २ वर

# उधार घेतलेले पैसे दिले नाहीत, परभणीत ३५ वर्षाच्या तरुणाची मित्रांकडून बेदम मारहाण करुन हत्या, मृतदेह शौचालयात टाकला

**परभणी । प्रतिनिधी**

घेतलेले पैसे परत दिले नाहीत म्हणून ३५ वर्षीय तरुणाला त्याच्या काही मित्रांनी बेदम मारहाण करून त्याची हत्या केल्याची घटना परभणीत घडली. हत्या केल्यानतंर मृतदेह हा सार्वजनिक शौचालयात टाकण्यात आला. अनंता टॉम्पे असं मृत तरुणाचं नाव आहे. परभणीच्या पाथरी शहरात ही घटना घडली असून पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आलं आहे.




मानवत शहरातील बिहार गल्ली भागात राहणाऱ्या ३५ वर्षीय अनंता टॉम्पे याला त्यांच्या मित्रांनी सोमवारी घरातून बोलावून नेले. त्यानंतर तो घरी परत आला नसल्याने त्याच्या पत्नीने मानवत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्याचवेळी पाथरी शहरातील बाबा टॉवर परिसरात

▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठवाड्यात बीडसह ‘या’ जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा, शेतकरी धास्तावले, काय काळजी घ्याल?

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठवाड्यात आज नांदेड, लातूर, धाराशिव जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांचा पाऊस येण्याची शक्यता प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवलीय. येत्या तीन दिवसात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून काही ठिकाणी झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, आता पुन्हा एकदा अवकाळी पावसाची शक्यता असल्याने शेतकऱ्यांवर काळजीचे ढग दाटलेत. १६ व १७ या दोन दिवसात वाऱ्याचा वेग ३०-४० प्रति किमी राहणार असून येत्या



काही दिवसात उष्ण व दमट हवामान राहणार आहे.

हवामान विभागाचा अंदाज काय?

दिनांक १६ व १७ एप्रिल रोजी मराठवाडयात तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक १७ एप्रिल रोजी बीड, धाराशिव व छत्रपती संभाजी नगर व दिनांक १८ एप्रिल रोजी छत्रपती संभाजी नगर, जालना, बीड, लातूर व धाराशिव जिल्हयात दिनांक १९ एप्रिल रोजी जालना, परभणी, हिंगोली, नांदेड व लातूर जिल्हयात तूरळक ठिकाणी उष्ण व दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील चार ते पाच दिवसात कमाल तापमानात हळूहळू २ ते ३ अं.से. ने वाढ होण्याची तर पुढील तीन ते चार दिवसात किमान तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही. दरम्यान वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने कृषी सल्ल्याची शिफारस केली आहे.

पीक व्यवस्थापन

काढणीस तयार असलेल्या हळद पिकाची काढणी करून घ्यावी. काढणी केलेल्या हळद पिकाची उकडणे, वाळवणे व पॉलीश करणे ही कामे करून मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी. उन्हाळी भुईमूग पिकात आवश्यकतेनूसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी


▶▶ उर्वरित पान २ वर

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची मंत्रालयातून घोषणा;

## शंकुतला खटावकर, ऋतुराज गायकवाड, यशस्वीसह ८९ खेळाडूंचा गौरव

**मुंबई । प्रतिनिधी**

सन २०२३-२४ च्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराची घोषणा क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज मंत्रालयात केली. माजी राष्ट्रीय कबड्डीपटू, संघटक शंकुतला खटावकर यांना जीवनगौरव तर पॅरा ऑलिम्पिक पदक विजेता सचिन खिलारी, जागितिक विजेते आर्चर आदिती स्वामी,ओजस देवतळे , क्रिकेटपटू शिवम दुबे, ऋतुराज गायकवाड , यशस्वी जैस्वाल यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा थेट पुरस्काराने गौरवित केले जाणार आहे. एकूण ८९ पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली.



पुण्यात शुक्रवार १८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार समारंभ होईल. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजीत पवार, केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, उपसभापती डॉ. नीलम गोर्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ आदी मान्यवर उपस्थित रहाणार आहे. अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर व क्रीडा आयुक्त हिरालाल सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# पाच लाखाच्या खंडणीसाठी बालकाचे अपहरण !



**बीड । प्रतिनिधी**

पाच लाख रुपयांसाठी एका नववर्षीय बालकाचे बीड शहरातील पांगरी रोड भागातून अपहरण केल्याची घटना पाच वाजता घडली होती. याची माहिती पोलिसांना मिळतात अवघ्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# वडवणीच्या भीम जन्मोत्सवाच्या महा भोजनदान कार्यक्रमातून दहा हजार लोकांनी घेतला महा भोजनाचा अस्वाद

## मराठा योद्धे मनोज जरांगे पाटील व धनंजय देशमुख यांची भेट

**वडवणी । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त वडवणी येथील सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने काल दिवसभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांच्या माध्यमातून तब्बल



दहा हजार लोकांनी जेवणाचा महाअस्वाद घेतला आहे. तर या उपक्रमाचे सर्वच सामाजिक स्तरातून विशेष कौतुक केले जात आहे.तर शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुख्य चौकाचे ध्वजारोहण व प्रथमचे पूजन युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. तर या भीम महोत्सवाला मराठा युद्धे मनोज जरांगे पाटील व मस्साजोगचे धनंजय देशमुख यांनी भेट देत अभिवादन केले आहे.


याबाबत अधिक माहिती अशी की, काल सकाळी ९ वा. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौका पासून ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत भव्य -दिव्य अशी मोटार सायकल रॅली काढण्यात आली. यावेळी महापुरुषांच्या जयघोषाने

▶▶ उर्वरित पान २ वर




# अष्टविनायक मंदिरांतील ड्रेसकोड स्वागतार्ह !

मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिरात ड्रेसकोड लागू झाल्यानंतर आता राज्यातील अष्टविनायक मंदिरांतही ड्रेसकोड लागू करण्यात आला आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी कोणते कपडे परिधान करून यावेत आणि कोणते कपडे परिधान करून मंदिरात प्रवेश निषिद्ध असेल याची सूचिच या मंदिरांच्या बाहेर लावली जाणार आहे. मंदिरातील सात्विकता अबाधित राहावी यासाठी मंदिर समित्यांनी घेतलेला हा निर्णय नक्कीच स्वागतार्ह आहे. गेल्या ३-४ वर्षांत राज्यातील अनेक सुप्रसिद्ध मंदिरांत ड्रेसकोड लागू करण्यात आले आहेत. याचे श्रेय हिंदू जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाला द्यावे लागेल. गेल्या काही वर्षांत त्यांनी राज्यातील मंदिरांच्या विश्वस्तांचे तसेच पुजाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात संघटन घडवून आणले. राज्यातील समस्त मंदिरांत भक्तांच्या सुविधेसाठी आणि मंदिराचे पावित्र्य अबाधित राहावे यासाठी काय काय करता येईल याविषयी चर्चा घडवून आणण्यासाठी आणि राज्यस्तरावर ध्येय धोरणे आखण्यासाठी अधिवेशने आणि शिबिरे यांचे आयोजन केले. ज्याची फलश्रुती आज विविध मंदिरांत दिसून येत आहे. आजवर या देशावर अनेक आक्रमकांनी हल्ले करून येथील वैभव लुटून नेले मात्र येथील संस्कृतीच्या खुणा त्यांना मिटवता आल्या नाही. या खुणा आणि त्यांचे पावित्र्य जतन करून ठेवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी मोठे योगदान दिले आहे, त्यामुळे ते पावित्र्य टिकवून ठेवण्याचे दायित्व आता आपल्या खांद्यावर आहे. महाराष्ट्रात जेव्हा मंदिरांतून वस्त्रसंहिता लागू करण्याचा प्रस्ताव मांडला गेला तेव्हा समाजातून जसे या भूमिकेचे स्वागत झाले तसा यास काही पुरोगामी मंडळींकडून विरोधही करण्यात आला. तरीही मागील दोन वर्षांत राज्यातील अनेक मंदिरांनी ड्रेसकोड लागू केले आहेत. गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव काळात राज्यातील काही उत्सव मंडळांनीही श्रीच्या मंडपात वस्त्रसंहितेचे पालन करणे बंधनकारक केले. दक्षिण भारतातील अनेक मंदिरांत मागील शेकडो वर्षांपासून वस्त्रसंहिता लागू करण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी महाराष्ट्रातून जाणारे भाविक त्याचे तंतोतंत पालन करतात, मग राज्यातील वस्त्रसंहितेला विरोध का ? मंदिरांच्या गाभाऱ्यात जाताना पुरुषांनी सोवळे आणि स्त्रियांनी साडी नेसावी ही प्रथा शेकडो वर्षांपासून चालत आली आहे, हे आपणा सर्वांना ज्ञात आहे, मग मंदिर परिसरातील वस्त्रसंहितेला आक्षेप नेमका कशासाठी ?





मुळात मंदिरे ही काही सहलीची ठिकाणे नाहीत कि ज्या ठिकाणी कोणी मौज मजेसाठी यावे. मंदिरात येणाऱ्या प्रत्येकाला त्या देवतेचे दर्शन घ्यायचे असते, देवतेच्या मूर्तितून प्रक्षेपित होणारे चैतन्य ग्रहण करायचे असते, आपले मागणे देवापुढे मांडायचे असते याचाच अर्थ तिथे देव प्रत्यक्ष आहे आणि तो आपले म्हणणे ऐकणार आहे अशी श्रद्धा येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात असते मग त्या देवतेच्या ठिकाणचे पावित्र्य जपणे आपले कर्तव्य नव्हे का ? मुलांना शाळेत पाठवताना आपण शाळांनी ठरवून दिलेला गणवेश घालून त्यांना पाठवतो, कार्पोरेट कार्यालयांतही कपड्यांच्या बाबतीत कंपनीने घालून दिलेले नियम कर्मचाऱ्यांना पाळावे लागतात. रुग्णालये, न्यायालये, पोलीस, टपाल कार्यालय सर्वच ठिकाणी ड्रेसकोड आहेत आणि वर्षोनुवर्षे या ड्रेसकोडचे पालन होत आलेले आहे, मग देवालयांत जाताना आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा कशी बरे येते ? कोरोना काळात कोरोना रुग्णांना भेटायला जाताना पीपीई किट परिधान करून जाणे बंधनकारक करण्यात आले होते त्यावेळी ते नियम डॉक्टरांनी केले होते म्हणून आपण सर्वानीच ते पाळले. मग धार्मिक स्थळांच्या बाबतीत धर्म आणि अध्यात्मशास्त्र जाणणाऱ्या मंडळींनी केलेले नियम आपल्याला मान्य का होत नाहीत ? देशाचे पंतप्रधान सुद्धा विविध मंदिरांत जाताना तेथील ड्रेसकोडचे पालन करतात. चित्रपटात अंग प्रदर्शन करणाऱ्या हॉलिवूड-बॉलिवूडमधील नायिकाही मंदिरांत जाताना साजेशी वस्त्र परिधान करतात, डोक्यावर पदर घेतात मग आपण या नियमांना विरोध करून नेमके कोणते पुढारलेपण दाखवत आहोत ? पुरातन मंदिरे ज्यावेळी निर्माण करण्यात आली त्यावेळी सामान्य लोकांचे पोशाख हे सात्विक आणि धर्माला अनुसरून होते त्यामुळे त्यावेळी वस्त्रसंहिता बनवण्याची गरजच निर्माण झालेली नव्हती. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा पगडा, धार्मिक स्थळांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला गेल्याने वस्त्रसंहिता लागू करणे आज अनिवार्य झाले आहे. मंदिरे ही पर्यटनाची केंद्रे नसून ती धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी योग्य ती शुचिर्भूतता पाळली जावी, मंदिरांचे पावित्र्य राखले जावे, मंदिरांत येणाऱ्या भाविकांचा देवतेप्रतीचा भाव टिकून राहावा यासाठी तोकडे आणि निषिद्ध कपडे परिधान करून मंदिरांत प्रवेश करण्यास अनेक देवस्थानांकडून घालण्यात आलेली बंदी स्वागतार्ह आहे.

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

पान १ वरून पुढे...

## बीड जिल्हा रुग्णालयात...

शस्त्रक्रिया गृहात पाठविले. आगोदर या महिलेची समुपदेशन केले. त्यानंतर स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. किरण शिंदे, डॉ.वाघमारे आदींना बोलावून घेत गर्भपिशवीची गंभीर शस्त्रक्रिया यशस्त्री केली. वरिष्ठांनी दखल घेतली खरी, परंतू नातेवाईकांनी प्रत्येकवेळी वरिष्ठांनाच सांगायचे ? संबंधित डॉक्टर, कर्मचारी आपले कर्तव्य प्रामाणिक बजावत नसतील तर त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणीही होत आहे.

दोन्ही राऊतांनी कठोर भूमिका घ्यावी

सध्या जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून डॉ. संजय राऊत तर अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून

डॉ. सदाशिव राऊत आहेत. त्यांनी सेवेत हलगर्जी, टोलवाटोलवी करणाऱ्या डॉक्टर, कर्मचाऱ्यांना शोधून कान टोचण्याची गरज आहे. आपल्या स्वभावात बदल करून थोडी कठोर भूमिका घेण्याची गरज आहे. आपले कोणीच काही करू शकत नाही, अशा अविर्भावात असणाऱ्यांना कारवाईचा दणका तर चांगले काम करणाऱ्यांचे कौतूक करणे आवश्यक आहे. जर असे केले नाही तर माता मृत्यू आणि रूग्णसेवेत हलगर्जी झाल्याच्या तक्रारी रोजच येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## उधार घेतलेले ....

असलेल्या नगरपरिषदेच्या सार्वजनिक शौचालयात एक जण बेशुद्ध अस्वस्थेत पडला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

शरीरावर मारहाणीचे व्रण

पोलिसांनी त्या रुग्णाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता त्याचा आधीच मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले. अनंता टॉम्पे यांच्या शरीरावर बेदम मारहाण केल्याचे व्रण होते. त्यामुळे ही हत्याच असल्याचं स्पष्ट झालं. ही हत्या उधारीचे पैसे न दिल्यामुळे झाली असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, या प्रकरणात मयत अनंता टॉम्पे यांच्या पत्नी रुपाली यांच्या फिर्यादीवरून पाथरी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तीन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाची पुढील तपास पाथरी पोलस करत आहेत.

## मराठवाड्यात बीडसह...

व्यवस्थापन करावे. भुईमूग पिकात आऱ्या सुटल्या नंतर अंतर म शागत करू नये. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) कीडींना आकर्षीत करण्यासाठी एकरी १० ते १२ पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत व तंबाखूवरील पाने

पान १ वरून पुढे...

खाणाऱ्या अळीचे व लाल केसाळ अळीचे समूहातील अंडी लहान अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंचा झाडिरेक्टिन (३० पीपीएम) ३ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

फळबागेचे व्यवस्थापन

घड लागलेल्या केळी झाडांना काठीने आधार द्यावा. काढणीस तयार असलेल्या केळीच्या घडांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. केळी बागेस आवश्यकतेनूसार सरी वरंब्याने पाणी द्यावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी केळी फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या केळीच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची काढणी करून घ्यावी. आंबा बागेत पाण्याचा ताण बसल्यामूळे फळगळ होऊ शकते, फळगळ होऊ नये म्हणून आंबा बागेत आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी आंबा फळझाडाच्या आळयात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या आंब्याच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. काढणी राहिलेल्या द्राक्ष फळांची काढणी करून घ्यावी. द्राक्ष बागेत एप्रिल छाटणीची पुर्व तयारी करून घ्यावी. द्राक्ष बागेतील माती मोक्ळी करून खत व्यवस्थापन करावे. द्राक्ष बागेमध्ये एप्रिल छाटणी ही घड निर्मितीसाठी केली जाते. द्राक्ष बागेत एप्रिल छाटणी १५ एप्रिल ते १५ मे या दरम्यान करावी. पाऊस पडण्याची शक्यता असल्यास एप्रिल छाटणी पुढे ढकलावी.

## शिवछत्रपती राज्य क्रीडा...

सन २०२२-२३ व २०२३-२४ अश्या दोन वर्षांच्या पुरस्कार समारंभाची तयारी सुरू करण्यात आली असल्याची माहिती राज्याचे क्रीडा सहसंचालक सुधीर मोरे यांनी दिली आहे. मुंबईत आज शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कारासह उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक-जिजामाता पुरस्कार, खेळाडूंसाठीचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा साहसी पुरस्कार ,दिव्यांग खेळाडूंचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार असे एकूण ८९ पुरस्काराची घोषणा करण्यात आली. १८ खेळाडूंना थेट पुरस्काराने सन्मानित करणयात येणार आहे. जीवन गौरवसाठी ५ लाख, शिवछत्रपती पुरस्करासाठी ३ लाख रूपये व सन्मानचिन्ह असे या पुरस्कराचे स्वरूप आहे.

पुरस्कराच्या घोषणेनंतर मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यात क्रीडा संस्कृतीचा वारसा जपला जाऊन त्याचे संवर्धन व्हावे, क्रीडा क्षेत्रात

पान १ वरून पुढे...

उल्लेखनीय कार्य करणा-या क्रीडा महर्षी, मार्गदर्शक, खेळाडूंच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याची गौरवशाली परंपरा आहे. पुण्यात दिमाखदार सोहळ्यात पुरस्कार देण्यात येणार आहे. २००१ पासून शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्काराची परंपरा सुरू झाली. पुरस्कार सुरू झाल्यापासून यंदा प्रथमच महिला खेळाडू शकुंतला खटावकर या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. १९७९ ते १९८२ कालावधीत १०६ राष्ट्रीय कबड्डी लढती खेळण्याचा विक्रम खटावकर यांनी केला होता. खटावकर यांनी राष्ट्रीय स्पर्धेत तब्बल ८ वेळा महाराष्ट्रासाठी विजेतेपद जिंकले आहे. महाराष्ट्र राज्य व पुणे जिल्हा कबड्डी संघटनेच्या त्या उपाध्यक्ष आहेत. १९७८ मध्ये केंद्र शासनाच्या अर्जून पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला होता.

## पाच लाखाच्या...

दीड तासात या अपहरणकर्त्याला जेरबंद करत मुलाची सुखरूप सुटका करण्यात आली. या आरोपीवर यापूर्वी देखील गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत त्यांनी दिली.

जगदीश गायकवाड असे आरोपीचे नाव आहे. गायकवाड याने पांगरी रोड भागातील एका हॉस्टेल मध्ये राहणाऱ्या नववर्षीय बालकाचे कुरकुरे देण्याचे आमिष दाखवून अपहरण केले होते. यानंतर त्याने मुलाच्या आई-वडिलांना फोन करत पाच लाख रुपये खंडणी देण्याची मागणी केली. पालकांनी याबाबत बीड पोलिसांशी संपर्क करत तक्रार नोंदवली. यानंतर स्थानिक गुन्हे शाखा शिवाजीनगर पोलीस यांच्या टीम कामाला लागल्या आणि अवघ्या दीड तासात आरोपीला जेरबंद करण्यात आले.

या प्रकरणात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जगदीश गायकवाड यांच्यावर यापूर्वी खंडणी लूटमार असे गुन्हे दाखल असून आता अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्याने त्यावर पोलीस काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान स्वतः पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी या सगळ्या प्रकरणात लक्ष देत या बालकाची सुटका करण्यासाठी मार्गदर्शन केले तसेच कामगिरी करणाऱ्या टीमचे अभिनंदन केले. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे मुन्ना वाघ, दुबाले, शिवाजीनगर चे विलास मोरे, रवींद्र आघाव, अभिजीत सानप याबरोबरच सायबर पोलीस चे विकी सुरवसे व इतरांनी कारवाई केली.

## वडवणीच्या भीम...

वडवणीकरांचे लक्ष वेधून घेतले. तर ठीक सकाळी १० वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुख्य चौकात कार्यक्रम संपन्न झाला. याठिकाणी निळा ध्वजाचे ध्वजारोहण व प्रथमेचे पूजन माजलगाव

पान १ वरून पुढे...

विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या हस्ते पार पाडले. या कार्यक्रमाला वडवणीचे तहसीलदार संजय जिरांगे, वडवणी पोलीस स्टेशनचे प्रमुख एपीआय अमन सिरसट, नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांच्यासह सर्वच नगरसेवक, विविध पक्षाचे नेते- पदाधिकारी, व्यापारी वर्ग, यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील नेते व कार्यकर्ते सह समाज बांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. यानंतर काल सकाळी ११ वाजल्यापासून डॉ. आंबेडकर चौक या ठिकाणीच स्नेह सुरची महाभोजनाचा कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली होती. अतिशय उत्कृष्ट असे सुरची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. उत्सव समितीच्या वतीने अतिशय चोखपणे नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वडवणी शहरासह संपूर्ण तालुक्यातील तब्बल सर्वच घटकातील दहा हजार लोकांनी या जेवणाचा महा अस्वाद घेतला आहे. तर पहिल्यांदाच असे मोठे नियोजन करण्यात आले असल्याचे दिसून आले आहे. तर या भोजनाच्या कार्यक्रमाचे सर्वच समाज बांधवांच्या माध्यमातून उत्सव समितीचे विशेष कौतुक करण्यात आले आहे. तर आज दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मराठा युध्दे मनोज जरांगे पाटील यांनी भीम जन्मोत्सव कार्यक्रमाला भेट दिली.जरांगे पाटील यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौकाला प्रथम अभिवादन केले. यानंतर समाज बांधवांना जयंतीच्या शुभेच्छा देत म्हणाले की, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तुम्हा-आम्हाला विचार दिला आहे. त्या विचाराचे पाईक होत सर्व समाज बांधवांनी गुण्यागोविंदाने राहावे तसेच सामाजिक परिवर्तन देखील करावे. प्रत्येक समाजातील तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे. तेव्हाच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सार्थकी लागली असे म्हणता येईल असे विचार जरांगे पाटील यांनी यावेळी मांडले मांडले. यावेळी मनोज जरांगे पाटील येणार आहेत. म्हणून वडवणीच्या मुख्य रस्त्यावर हजारोंच्या संख्येने सर्व समाज बांधव उपस्थित होते. तर त्यांच्या समावेत मसाजोग येथील धनंजय देशमुख यांचे देखील उपस्थिती होती. यानंतर आझाद क्रांती सेनेचे संस्थापक के अध्यक्ष राजेश घोडे यांनी देखील भीम जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाला भेट दिली आहे. यावेळी सर्व मान्यवरांचे आभार जयंती उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष राहुल घाडगे यांनी मानले आहेत.तर हा कार्यक्रम जेष्ठ मार्गदर्शकाच्या नियोजनाखाली घेण्यात आला आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे

कार्याध्यक्ष-परमेश्वर उजगरे, उपध्यक्ष-बाबासाहेब वाघमारे, प्रशांत (लखन) उजगरे, समाधान उजगरे, दिलीप रोकडे, सचिव-अमोल मुरालीधर उजगरे, कोषाध्यक्ष-शाम सुधाकर उजगरे, संघटक-प्रज्वल उजगरे, अजिंक्य उजगरे, सहसंघटक- अमोल वाघमारे, युवराज उजगरे, सहसचिव-किरण उजगरे (आमदार), राज उजगरे, रामेश्वर पाटोळे यांच्यासह समाजातील तरुणांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

पान ४ वरून पुढे...

## शेतीमालाला भाव नाही ...

मिळावा यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक ढास आंदोलनात सहभागी बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी तब्बल दिड लाख रुपये खर्चून टोमॅटोचे पिक आणले.मात्र विक्रीसाठी परवडत नसल्याने टोमॅटो शेतातच झाडावर पिकुन गळु लागले आहेत. त्यांच्या शेतातील २०० किलो टोमॅटो लाल चिखल आक्रोश आंदोलनासाठी वापरण्यात आले असुन अशोक ढास आंदोलनात सहभागी होते.

शेतकऱ्यांप्रती असंवेदनशील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची

पान ४ वरून पुढे...

मंत्रीपदावरुन हकालपट्टी करा अस्मानी आणि सुलतानी संकटांनी आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांप्रती कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे पिक विमा प्रकरणी भिका-याशी शेतकऱ्यांची तुलना करतात तर कधी शेतकरी कर्जमाफीचा पैसा शेतीत न गुंतवता साखरपुडा आणि लग्नावर खर्च करतात तर कधी शेतकरी जास्त उत्पादन करत असल्याने शेतमालाला भाव नाही असे वारंवार असंवेदनशील वक्तव्य करत असुन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी त्यांना याबाबत समज द्यावी आणि त्यांच्यात सुधारणा होत नसेल तर त्यांना कृषी मंत्री पदावरून हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

## विश्वभूषण डॉ.बाबासाहेब...

पूजन करुन जुना मोंढा रोड या मार्गाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर

पान ४ वरून पुढे...

स्मारक भीम नगर माजलगाव येथे ठीक १२ वाजता बुद्ध वंदनेने रॅलीची सांगता झाली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धकृती स्मारकास पुष्पहार अर्पण करून उपजिल्हाधिकारी मा.गौरव इंगोले माजलगाव शहर पोलिस निरीक्षक मा.राहुल सूर्यतळ, माजलगाव ग्रामीण पोलीस अधीक्षक मा.बालक कोळी यांनी व तमाम जनसमुदायांनी अभिवादन केले.

या समता ज्योत रॅली मध्ये उपजिल्हाधिकारी मा.गौरव इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती माजलगाव शहर पोलीस अधीक्षक मा.राहुल सूर्यतळ माजलगाव ग्रामीण पोलीस अधीक्षक मा.बालक कोळी व सर्व पोलीस प्रशासन तसेच माजलगाव येथील सर्वपक्ष संघटनेचे पदाधिकारी व्यापारी व शिव-शाहू-फुले-आंबेडकरी युवकांची युवतींची व विशेष महिलांची उपस्थिती होती. हि रॅली यशस्वी करण्यासाठी माजलगाव शहरातील शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी यांनी परिश्रम घेतले.

पान ४ वरून पुढे...

## बीएसएनएल कार्यालयात...

तसेच ही संयुक्त जयंती १९८९ पासून बीड बीएसएनएल कार्यालयात साजरी करण्यात येते हे सुद्धा नमूद केले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना उपमहाप्रबंध श्री अनारे साहेब यांनी शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा महामंत्र डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला असे नमूद केले. यावेळी उपविभागीय अभियंता श्री अनिरुद्ध कुलकर्णी श्री मनोहर कैवाडे, अजय घोडमारे जगदीश सिंनधव, ठाकूर साहेब, पोकळे साहेब, वरुडे साहेब, राऊत मारे अश्विनपालसिंगनकार, शारदा कुमारी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री राहुल सोनवणे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी न जाधव, रवींद्र वडमारे, ढेपे प्रशांत कुमार नीरज कुमार जगदीश सिंधव परिश्रम घेतले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र | संमिश्र | बुधवार, दि. १६ एप्रील २०२५ | पान ३

महत्वाचे

## श्री नारायण विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे श्री नारायण मा. व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन केले . प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर , आहेर चिंचोलीचे सरपंच विकास रकटे, उपसरपंच गणेश बहिर हे होते. श्री भिमराव इनकर सरांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषण केल . सूत्रसंचालन प्राध्यापिका बबीता भुतावळे मॅडम यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.अशोक घरत सर यांनी केले आभार प्रदर्शन प्रा. धर्मराज पौळ सर यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक श्री मस्के जी.बी,श्री मुरमुडे ए .एन, श्री रकटे पि. आर,श्री करपे सर, श्री इनकर बी.जे, श्री रकटे बी. आर,श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी,कदम एस .व्ही, श्री पवार पी .एल, श्री, चव्हाण सर तसेच विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खर्डेवाडी येथे ह.भ.प.तनया दिदी बढे यांचे हरीकिर्तन

बीड । प्रतिनिधी



बीड तालुक्यातील मौजे खर्डेवाडी येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी चैत्र वद्य पंचमी दि.१८/४/२५ ला अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ. प महादेव महाराज तात्या,ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे .ह.भ.प.भिवसेन महाराज भोसले,ह.भ.प राजेन महाराज भोसले यांच्या शुभ हस्ते सप्ताहाची सुरवात होणार आहे . या सात दिवस चालणाऱ्या नाम सप्ताह मध्ये काकडा, भजन,ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन ,भावार्थ रामायण,प्रवचन, हरिपाठ व हरिकिर्तनआणि हरिजागर असे विविध कार्यक्रम आहेत. या सप्ताह मध्ये ह.भ प. राजेन महाराज भोसले,ह.भ प. श्रीनिवास महाराज जगताप,ह.ह.प. श्री किसन महाराज पवार,ह.भ.प. रतन महाराज,ह.भ.प.सतीश महाराज, ह भ.प. दिपक महाराज तसेच सप्ताहात एकमेव महिला कीर्तनकार ह.भ.प. तनाया दिदी बढे , खेड जी.पुणे यांचे शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत शुश्राव्य हरिकीर्तन होणार आहे तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सर्व कार्यक्रमाचा आनंद घ्यावा.असे आवाहन मुकादम मंडळ खर्डेवाडी यांनी केले आहे २५ एप्रिल २०२५ रोजी शुक्रवार सकाळी ११ ते १ या वेळेत ह.भ.प. श्री लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता होईल. या सप्तहासाठी मृंदग सेवा बाळू महाराज बसवर ,गणेश महाराज भोसले आणि गोविंद महाराज भोसले यांची राहणार आहे तरी सर्व भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताहातील सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन भजनी मंडळ आणि गावकरी मंडळी खर्डेवाडी यांनी केले आहे.

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



नेकनूर । प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर येथे राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुनिता गायकवाड व प्रा. बचुटे जी. डी. यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बोलताना सुनिता गायकवाड म्हणाल्या की, भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मुजावर एस. टी. यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अंकुश काळे यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फुले -आंबेडकर जयंतीनिमित्त धोंडराईत रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

## या रक्तदान शिबिरामध्ये ५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

गेवराई । प्रतिनिधी

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त रक्तदान करून महामानवाला अभिवादन करूयात असा संकल्प करत दि. १४ एप्रिल रोजी सकाळी धोंडराई येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती उत्सवाच्या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिर लोकनियुक्त सरपंच शितलताई साखरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. या रक्तदान शिबिरामध्ये एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

ज्या मानवाने आपले संपूर्ण आयुष्य मानव कल्याणासाठी खर्ची केले त्या महाम ानवाच्या कार्यापासूनच प्रेरणा घेऊन अनेक संकटातून बाहेर जात आहोतच व. रक्तांचा तुटवडा पडत असताना धोंडराईतील समाज बांधवांनी एकत्रित येऊन रक्तदान करून खऱ्या अर्थाने मानव कल्याणाचे काम करून या दोन्ही महामानवांना अभिवादन केले. दिवसभर सुरू असलेल्या या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या कार्याला फुले -आंबेडकर प्रेमी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.



## राजर्षी शाहू कन्या विद्यालयात महामानवाला अभिवादन

बीड । प्रतिनिधी



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन, कार्य आणि विचार सर्वांना प्रेरणादायी असून त्यांनी दाखविलेल्या मार्गावर जीवनक्रम ठेवणे हेच खरे त्यांना अभिवादन ठरेल असे प्रतिपादन श्रीम.एम.एस.सोनवणे यांनी केले. श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ एप्रिल भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव प्रा. व्ही.एल. जोगदंड तर प्रमुख पाहुणे संस्था अध्यक्ष इंजि. बलभिमराव जाहेर पाटील,सचिव प्रा.जे.पी.शेळके, संचालक प्रा. ए.आर.डंबरे, विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक के.बी. सोंडगे, मुख्याध्यापक आर. टी. राऊत,राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या आर. डी.लोखंडे यांची उपस्थिती होती. प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज, राजमाता जिजाऊ,सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पम ाला अर्पण करुन अभिवादनानंतर व्याख्यानास सुरुवात करण्यात आली.

महामानवाच्या कार्याविषयी बोलतांना श्रीम.एम.एस.सोनवणे म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खूप मोठे विद्वान होते. त्यांना वाचनाची प्रचंड आवड होती. त्यासाठी त्यांनी आपल्या घरातच एक ग्रंथालय बनविले होते. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी काही महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. ते ग्रंथ सामाजिक,आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीयदृष्ट्या फार महत्त्वाचे आहेत. ते ग्रंथ वाचल्याशिवाय आपल्याला त्या ग्रंथांचे महत्त्व लक्षात येणार नाही. ग्रंथ लेखणासोबतच त्यांनी वृत्तपत्रे पण सुरू केली, त्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक सहाय्य देखील केले.

## सांगवी (पा.) येथील सुदर्शन विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील २००९ सालचे दहावी वर्गातील माजी विद्यार्थी एकत्र येत व आपल्या वेळेतील शिक्षकांनाही कार्यक्रमासाठी बोलवत १६ वर्षानंतर एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. त्यामुळे १६ वर्षानंतर पुन्हा एकदा शाळेमध्ये दहावीचा वर्ग भरला होता. कार्यक्रम प्रसंगी प्रथम प्रमुख पाहुणे व शिक्षकवृंद , विद्यार्थी यांच्या उपस्थित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली. व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.विशेष म्हणजे त्यावेळचे वर्गशिक्षक सूर्यवंशी सर यांनी वर्गात हजेरी घेतली यावेळी मुलं व मुली मिळून ३५ विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद पाहावयास मिळत होता. आष्टी तालुक्यातील सुदर्शन विद्यालय सांगवी पाटण येथील २००९ सालच्या दहावीच्या बॅचचे सर्व माजी विद्यार्थी सोमवार दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी १०ते दुपारी २ वाजे पर्यंत एकत्र येत स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते. स्नेह मेळाव्यासाठी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक दिंडे सर हे होते तर या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती प्रसिध्द उद्योजक पांडुरंग सोनवणे, मा. सभापती शत्रुघ्न म रकड , सरपंच दत्तात्रय खोटे तसेच शिक्षकवृंद मुख्याध्यापक बोडखे शिक्षकवृंद उपस्थित होते.

## क्रांती महिला असंघटीत कामगार युनियन महाराष्ट्र राज्य च्या कार्यकारी मंडळाची बैठक संपन्न



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथे क्रांती महिला असंघटित कामगार संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत ग्राम ीण भागातील बेरोजगार,शेतमजूर आणि कष्टकऱ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने तसेच शासकीय आणि ग्रामपंचायत स्तरावर शासकीय आणि ग्राम पंचायत स्तरावर शेतमजुरांना काम उपलब्ध करून देण्यास संबंधित अधिकारीवर्ग हलगर्जीपणा करीत असल्याने तालुक्यातील बेरोजगारांची आणि शेतम जुरांची अवस्था अतिशय वाईट आणि बिकट आहे.यातून मार्ग काढण्यासाठी गाव पातळीवरील सक्रिय असणाऱ्या कार्यकर्त्यांसह संस्थेच्या कार्यकारी मंडळाची बैठक पुढील आठवड्यात घेण्यात येईल.या बैठकीत रोजगाराच्या प्रश्नावर आंदोलन,दिशा कृती कार्यक्रम निश्चित करण्यासाठी व्यापक बैठक दिनांक २० एप्रिल २०२५ रोजी घेण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्ष शाहीन पठाण यांनी दिली.

याविषयी बैठकीत चर्चा करताना ग्राम पातळीवर शेतम जूर आणि बेरोजगारांचे अनेक प्रश्न चर्चिले गेले. ग्रामपंचायत स्तरावर काम मागणी अर्ज दाखल करून घेण्यास संबंधित ग्रामपंचायतीतील जबाबदार अधिकारी आणि पदाधिकारी टाळाटाळ करतात. अर्ज दाखल करून घेत नाहीत. परिणामी रोजगाराचा हक्क हा कायद्याच्या पुस्तकातच राहतो. त्याचा लाभ आणि फायदा गरजूंना होत नाही. या परिस्थितीवर मात करण्यासाठी या प्रश्नी व्यापक आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागण्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आले. या बैठकीस अध्यक्ष शाहीन पठाण यांच्यासह मनीषा शरणागत,शकुंतला घुंगासे,अंजुम पठाण, शेख आमेर पाशा, मन्सूर भाई,अखिल भाई आणि ॲड.संदेश पोतदार हे उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न



बीड । प्रतिनिधी

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, कायदेमंत्री, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस.धुतालमल, सचिव ॲड. व्ही.बी. मगर सर्व संचालक आणि मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीम ध्ये उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शालेय परिसरातून प्रभात फेरी आयोजित करण्यात आली आणि राजवीर ढोकणे, सुजल भोंडवे, कृष्णा हंगे या विद्यार्थ्यांनी भीम जयंती निमित्त गीत गायन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू. एस. वाघमारे यांनी केले यावेळी यु.बी. पवळ, आर.बी.घुले श्रीमती एन.जी. मुंडे हे शिक्षक आणि एल.बी. हजारे, एस. एस. गायकवाड, भारत कोळेकर, सेवानिवृत्त कर्मचारी डी.जी. हजारे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# हिंगणी खुर्द येथे शेतात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी



चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द येथे शेतात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

यावेळी उपस्थित सर्व शेतकऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प करून अभिवादन करण्यात आले. यावेळी येथील शेतात ऊस लागवड सुरू असताना शेतातच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेमी नागरिक यांनी शेतातच जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. यावेळी सुनील गायकवाड, रामभाऊ गायकवाड, पप्पु आंधळे, विठ्ठल तांदळे, राम तांदळे, चंद्रकांत नागरगोजे, संदीप नागरगोजे, अमोल तांदळे, यांच्यासह महिला उपस्थित होत्या. यावेळी प्रतिमा पु जन करून अभिवादन केल्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने घोषणा देत जयंती आगळ्या वेगळ्या पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
बुधवार, दि.१६ एप्रिल २०२५ पान ४

## नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नात्याला काळीमा फासणारी घटना जन्मदात्या पित्यानेच केला अकरा वर्षीय मुलीवर अत्याचार

**नेकनूर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नात्याला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. जन्मदात्या पित्यानेच आपल्या ११ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याची संतापजनक घटना शुक्रवार रोजी घडली होती. या प्रकारणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका गावातील दाम्पत्यामध्ये घरगुती कारणावरून वाद निर्माण झाले होते. या वादातून आरोपीची पत्नी पुण्याला निघून गेली होती. तर मुलगी एकटी घरी होती. शुक्रवारी रात्री राहत्या घरातच नराधम पित्याने पोटाच्या मुलीवर अत्याचार केला. सदरील प्रकार हा मुलीची आई पुण्यावरून आल्यानंतर समोर आला. पिडीतेच्या आईने याबाबत नेकनूर पोलीस ठाण्यात जावून नराधम पित्या विरोधात तक्रार दाखल केली त्यानुसार आरोपीविरोधात बाल लैगिंक अत्याचार विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सध्या नराधाम आरोपी नेकनूर पोलिसांच्या ताब्यात आहे. या घटनेमुळे नेकनूर परिसरात खळबळ उडाली.

# शेतीमालाला भाव नाही , उत्पादन खर्च अधिक आणि उत्पन्न कमी

## सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाल चिखल आक्रोश आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

दुष्काळ , अवकाळी पाऊस नापिकी या अस्मानी संकटासोबतच शेतीमालाला भाव नसणे , सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या सुलतानी संकटाचा सामना करावा लागत असुन शेतीमालाला हमीभाव नसुन उत्पादन खर्च अधिक आणि उत्पन्न कमी असुन सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक मल्हारी ढास यांनी एका एकरात तब्बल दीड लाख रुपये खर्च करून आलेलं टोमॅटो पिक विक्रीसाठी परवडत नसल्याने झाडावरचं शेतात खराब होऊ लागले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळावी आणि शेतकऱ्यांप्रती वारंवार असंवेदनशील वक्तव्य करणाऱ्या कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१५ मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात टोमॅटो तुडवत लक्ष्यवेधी लाल चिखल आक्रोश आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात टोमॅटो उत्पादक शेतकरी अशोक ढास,शेख युनुस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, प्रदीप औसरमल, गौतम कोरडे,आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे आदी सहभागी होते.



अस्मानी सुलतानी संकटाचा साम ना करत शेतकरी शेती करतो. त्यातही वाढलेल्या खत बियाणे, युरीया आणि फवारणीच्या औषधांच्या वाढत्या किंम ती,मजुरीच्या दरात वाढ,वाहतुकीचा खर्च करून पिकविलेल्या मालाला कमी भावात बाजारात विकावे लागते. नाईलाजाने शेतकऱ्यांना कमी किंमतीत शेतमाल विकुन आर्थिक नुकसान सहन करावे लागते.यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकटाचा सामना करण्याची वेळ आली आहे. सरकारच्या धोरणांमुळे शेतीमालाला भाव मिळत नसुन शेतकऱ्यांवर अन्याय होत असुन नापिकीमुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे.यातुन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल शेतकरी उचलत आहेत.

शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत.सरकारची ऊदासीनता याला जबाबदार असुन शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे मुश्किल झाले आहे.सरकारचे आर्थिक धोरण शेतकऱ्यांना मारक ठरत आहे.

शेतक-यांच्या शेतीमालाला योग्य हमीभाव ▶▶ उर्वरित पान २ वर

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्सहात साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट मध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्सहात साजरी करण्यात आली.



याप्रसंगी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अँड. रविंद्र कानडे यांनी आपले विचार मांडताना सांगितले की,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील आर्थिक राजकीय व सामाजिक विषमतेला आळा घालून सर्वाना एकत्र करण्यासाठी यशस्वी कार्य केले स्त्रियांना त्यांचा हक्क मिळावा करीता संघर्ष केला व समाज साक्षरता अभियान राबवून लोकांना त्यांचा हक्क मिळवून दिला त्यांच्या संघर्षमय जीवन आपण अमलात आणून समाजात संस्थेच्या वतीने आर्थिक साक्षरता अभियान राबवणे व दुर्बल स्त्रियांना आर्थिक साहाय्य करून हक्काबरोबर बरोबर आर्थिक सक्षम बनवण्याचा जयंती निमित्त संकल्प करून आज जयंती निमित्त संकल्प दिन संस्थेत साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे मुख्य सरव्यवस्थापक श्री भिसे,जनरल मॅनेजर श्री आडेप,श्री वीर व श्री शेंडगे व सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या उत्सहाने उपस्थित होता.

# विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य समता ज्योत रॅली उत्साहात संपन्न

## पोलीस प्रशासन च्या पुढाकाराने द्वितीय वर्षीय समता ज्योत रॅली यशस्वी येणाऱ्या प्रत्येक वर्षी देखील हि परंपरा कायम राहील - पोलीस प्रशासन

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती च्या पूर्वसंध्येला शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी व पोलीस प्रशासन माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य समता रॅली चे आयोजन



करण्यात आले होते ही समता रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहचली व तेथे ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे ▶▶ उर्वरित पान २ वर



*वडवणी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलग्नीत व साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वैष्णवी महाविद्यालयांमध्ये भारतरत्न ,बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३४ जयंती अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव डॉ.रणजीत बन्सीधरराव मस्के पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य,डॉ.शामसुंदर गुळभिले व इतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.*

# बीएसएनएल कार्यालयात महापुरुषांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

येथील भारत संचार निगम लिमिटेड कार्यालयात युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, आणि भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून उपमहाप्रबंधक श्री आनारे साहेब हे तर प्रमुख पाहुणे म्हणून जालिंदर भोरे हे उपस्थित होते.



याप्रसंगी प्रमुख पाहुणे जालिंदर भोरे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जाती तोडो समाज जोडो या विषयावर सविस्तर चर्चा केली तसेच तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रेरणा घ्यावी व महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या कार्याचे सविस्तर विवेचन केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत सेवानिवृत्त दूरसंचार अधिकारी श्री भीमराव कांबळे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची माहिती दिली ▶▶ उर्वरित पान २ वर

# नवगण राजुरी येथे शुक्रवारी जंगी कुस्त्यांचे सामने

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सय्यद जानपीर उरूस निमित्त शुक्रवार दि.१८ एप्रिल रोजी जंगी कुस्त्यांच्या सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे.



सय्यद जानपीर उरूस निमित्त नवगण राजुरी येथे बुधवार दि.१६ रोजी संदल आणि भव्य मिरवणूक निघणार आहे. गुरूवार दि.१७ रोजी ताजी यात्रा व शुक्रवार दि.१८ एप्रिल रोजी जंगी कुस्त्यांचे सामने होणार आहेत. या कुस्त्यांच्या हंगामात अनेक मोठमोठ्या कुस्त्या होणार आहेत. कुस्ती विजेत्या मल्लास बक्षीस देण्यात येणार असून नामांकित कुस्ती विजेत्यास श्री गजानन सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन रविंद्र क्षीरसागर यांच्या हस्ते रोख २१०००/- रू बक्षीस देण्यात येणार आहे तरी या कुस्त्यांच्या हंगामास जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील कुस्तीगीर मल्लांनी सहभागी व्हावे असे आवाहन सय्यद जानपीर उरूस कमिटी नवगण राजुरी यांनी केले आहे.

# लिंबागणेश येथे आयुष्यमान आरोग्य शिबिर संपन्न...

## प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत स्त्युत उपक्रम

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे दि. २५ एप्रिल रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र लिंबागणेश यांच्या मार्फत आयुष्यमान आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गावचे सरपंच बालासाहेब जाधव यांच्या हस्ते यांच्या आयुष्यमान आरोग्य शिबिराचे उद्धाटन करण्यात आले यावेळी, बाळकृष्ण थोरात दादाजी गायकवाड तसेच पत्रकार हरिओम क्षीरसागर व वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीमती चिटकूलवार, डॉ. घुमरे अविराज तसेच या शिबिरास उपस्थित बीड वरून आलेले आयुष्यमान शिबिरास लाभलेले डोळ्याचे डॉ. श्रीमती ढाकणे यांच्यामार्फत डोळ्याच्या तपासणी करण्यात आल्या यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र लिंबागणेश येथील आरोग्य सहाय्यक लोखंडे अशोक फार्मासिट ऑफिसर श्रीमती कंचार ,लॅब टेक्निशियन लांडगे,ऋषिकेश शेळके, कर्मचारी हिंदोळे सिस्टर,गटप्रवर्तक शेख नफिसा व परिचर अवसरे , तसेच तपासणी करिता आलेले गावातील मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ उपस्थित होते . गावातील ग्रामस्थांनी आयुष्यमान शिबिरास मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत स्वतःची आरोग्य तपासणी करून घेतली.



